# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०३/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत बस स्टॉप कोंढाळी येथे दिनांक २९/०९/२२ चे १२.३० वा. ते १३.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— संजीवनी प्रमोद नृपनारायन वय ५५ वर्ष रा. सरपापुर ता.चांदुरबाजार जि अमरावती या काटोल वरून अमरावती जाण्याकरीता बसस्टॉप कोंढाळी येथे आले व गोंदीया अमरावती जाणाऱ्या बसमध्ये चढत असतांना त्यांच्या बॅगमध्ये असलेली पिवळया रंगाची पर्समध्ये असलेले सोन्याचे दागिने असा एकुण कि. १२,३००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार दिलीप इंगळे मो क्र ९०११११९५२२ हे करीत आहे.

### फसवणुक

१) **पो.स्टे. कुही** :— अंतर्गत मौजा पिपरी वडेगाव काळे येथे दिनांक २२/११/२०१३ पासुन आज पावेतो फिर्यादी नामे— राकेश सुरेश भांडे, वय ३३ वर्ष, रा. प्लॅाट नं. ११ भांडेप्लॅाट नागपुर व आरोपी नामे— सदानंद हरिभाउ भांडे, रा. भांडेप्लॅाट नागपुर हे एकमेकांचे नातेवाईक असुन स्वर्गीय हरिभाउ रामचंद्र भांडे यांचे मालकीची मौजा पिपरी वडेगाव गावठंन येथे ४०००० चौरस फुट जागा होती. या जागेवर फिर्यादी यांचे वडील सुरेश भांडे व मोठे वडिल सदानंद भांडे आत्या सुनंदा, सुमन भांडे असे नाव होते. दि. ०४.११.२००३ रोजी तयार केलेले रजिस्टर हक्क सोडण्यामध्ये फक्त नागपुरच्या प्रॉर्टीचा उल्लेख आहे. सदर पत्रात पिपरी वडेगाव येथील प्रॉर्टीचा उल्लेख नाही. फिर्यादीचे मोठे वडिल सदानंद हरिभाउ भांडे यांनी दुय्यम निबंधक वर्ग—२ नागपुर ग्रामीण येथे खोटी कागदपत्रे तयार करून हक्क सोडण्याचा लेख सन २००३ मध्ये तयार केला होता. यात सदानंद हरिभाउ भांडे यांना या जागेचा हक्क देण्यात येते. अशा प्रकारे बनावटी बोगस कागदपत्रे बनवुन वडेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे स्वताचा नावावर दि. २२.११.२०१३ ला करून घेतील सदर ४००० चौरस फुट जागे मधील २००० चौरस फुट जागा दि. ०५.०३.२०१४ ईस्त्राईल खान गुलाब खान यांना विक्रीपत्रा नुसार ४२०,०००/—रू. मध्ये विक्रीपत्र केली. अशाप्रकारे आरोपीने फिर्यादीची व नातेवाईकाची ४२०,०००/—रू. ची आर्थीक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री शिवाजी बोरकर हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील राणी लक्ष्मीबाई शाळेच्या जवळ मेनरोड येथे दिनांक ३०/०३/२२ चे सकाळी ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— बापुराव शामराव बारई वय ५९ वर्ष रा. दहेगाव जोशी हा त्याची अॅक्टीवा मोपेड वर जात असतांना यातील दोन अज्ञात आरोपी वय अंदाजे ३० ते ४० वर्ष यांनी ते पोलीस आहे अशी खोटी माहीती देवुन 'समोर खुन झाला आहे गळयातील गोप व हातातील अंगठी गाडीचे डीक्कीत ठेवुन घ्या' अशी खोटी माहीती देवुन फिर्यादीचे १५ ग्रॅम सोन्याचा गोप व ६ ग्रॅम सोन्याची अंगठी असा एकुण कि. ६०,०००/—रू. चा माल मुददेमाल हस्तगत करून फिर्यादीची फसवणुक करून पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४१९, ४२०, १७० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप. नि. पळनाटे मो.क्र. ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**